# जालन्यामध्ये संसाधन व्यक्ती आणि केंद्रप्रमुख यांच्यासाठी कार्यशाळा

जानेवारी महिन्यात जालना येथे निपुण भारत मिशन समोर ठेवत क्षमता आधारित शिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना आणि ग्यानप्रकाश फाऊंडेशन,पुणे यांनी संयुक्तपणे ही कार्यशाळा घेतली. डायट जालनामधील सहा व्याख्याते, दोन उपशिक्षणाधिकारी, आठ गटशिक्षणाधिकारी, २५ शिक्षण विस्तार अधिकारी, ग्यान प्रकाश फाऊंडेशनचे प्रतिनिधि, १०६ केंद्रप्रमुख आणि ४८ संसाधन व्यक्ती या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

क्षमता आधारित शिक्षणाशी संलग्न अशा प्रभावी वर्गप्रक्रियांवर चर्चा करून त्यांचे प्रात्यक्षिक करून बघणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. त्याखेरीज, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण परिषद, पालक शैक्षणिक आढावा सभा, ग्रामसभा, आणि विविध भागधारकांची भूमिका यांकडे लक्ष वेधण्याचा उद्देश या कार्यशाळेमागे होता.

या तीन दिवसीय कार्यशाळेत सर्वप्रथम ग्यान प्रकाश फाऊंडेशनच्या प्रतिनिधींनी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान कार्यक्रमाची उद्दिष्टे या विषयावर चर्चा घडवून आणली. त्यासाठी या कार्यक्रमाची आठ उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. क्षमता आधारित शिक्षणाला धरून वर्गप्रक्रिया, तसेच शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण परिषद, शैक्षणिक ग्रामसभा आणि केंद्र संसाधन गट यावरही चर्चा झाली.

या चर्चेमध्ये मूल-केंद्रित शिक्षण, ज्ञान आणि कौशल्यांचा व्यवहारात वापर करणे, एखाद्या विषयाशी संबंधित क्षमता बांधणी करणे, अर्थपूर्ण अध्ययन अनुभव देणे, आणि मूल्यमापनाचे महत्त्व या विषयांना स्पर्श करण्यात आला. तसेच क्षमता आणि क्षमता आधारित शिक्षण या संकल्पनांचा उदाहरणांसहित अधिक खोलात जाऊन विचार करण्यात आला.





त्यानंतर कार्यशाळेला उपस्थित असलेल्यांचे लहान गट करून, क्षमता आधारित शिक्षणाच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण परिषद, शैक्षणिक ग्रामसभा, केंद्र संसाधन गट आणि पालक शैक्षणिक आढावा सभा इत्यादी प्रक्रिया कशा होतील याचे सादरीकरण झाले. यातून सर्व भागधारकांमध्ये या प्रक्रियांबद्दल एकवाक्यता येण्याची गरज असल्याचे दिसून आले.

त्यानंतर केंद्र संसाधन गट स्थापन करून शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण परिषद, शैक्षणिक ग्रामसभा, आणि पालक शैक्षणिक आढावा सभा या बैठका नियमितपणे घेण्याचे ठरले. तसेच उपस्थितांनी पुढील महिन्यात आपण आपल्या वर्गांमध्ये कोणत्या अध्ययन निष्पत्तीवर आणि क्षमतांवर काम करणार आहोत हे लिहून काढून त्यासाठी कोणते अध्ययन अनुभव देता येतील ते निश्चित केले.

जालना डायटचे प्राचार्य श्री. कांबळे सर कार्यशाळेवरील आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले, “आपल्या जिल्ह्यात निपुण भारत कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना शिक्षकांचा क्षमता विकास करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वाची आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यायला हवे. मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या ध्येयामध्ये आपल्याला ग्यानप्रकाश फाऊंडेशनची खूपच मदत होऊ शकते.”

मंथा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. चव्हाण म्हणाले, “केंद्रप्रमुख म्हणून माझी भूमिका काय असावी याविषयी या कार्यशाळेतून मला काही महत्त्वाच्या गोष्टी कळल्या आहेत. आमच्या केंद्रामध्ये दर्जेदार शिक्षण कसे देता येईल हे आता मला अधिक स्पष्ट झाले आहे.”






© : ग्यान प्रकाश फाउंडेशन